## परिशिष्ट-III

## हमीपत्र

मी / आम्ही -------------------------------------------, वय --------- वर्षे_____, याद्वारे प्रतिपादन करतो की, मी/आम्ही भारतीय रहिवासी/ --------------------------------------- या संस्थेचा अध्यक्ष/सचिव/ अधिकृत स्वाक्षरीकर्ता असून संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता ___________________________ आहे.

(1) आमच्या संस्थेचा नोंदणी क्रमांक ___________________________ असा आहे.

(2) मी / आम्ही असे प्रतिपादन करतो की, मी/आम्ही ----------------------------- या ठिकाणी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी तात्पुरता मंडप उभारण्याच्या परवानगीसाठी अर्ज केला आहे.

(3) मी / आम्ही असे ही प्रतिपादन करतो की, मी/आम्ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मुंबई अग्निशमन दलाकडून प्रसारीत केलेल्या सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजनांचा (Codified Fire Safety Measures) अभ्यास केला आहे. मी/आम्ही अशी हमी देतो कि नमूद सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजनांचे (Codified Fire Safety Measures) मी/आम्हीपूर्णपणे पालन करु तसेच ज्याव्दारे आग लागेल अशी किंवा नियमबाहय कोणतीही कृती मी/आम्ही करणार नाही.

(4) मी / आम्ही अशी हमी देतो की, मंडपामध्ये विद्युत उपकरणे अथवा संसाधने बसविताना ती मान्यताप्राप्त विद्युत निरीक्षक यांच्याकडून प्रचलित विद्युत कायदा आणि नियमामधील तरतुदीनुसार बसवून घेऊ.

(5) मी आम्ही / अशी हमी देतो की, “महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६” च्या कलम ३ (१) मधील आणि नियम २००९ मधील तरतुदीनुसार, अग्निसुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करु आणि ही सर्व अग्निसुरक्षा उपकरणे सुस्थितीत ठेवू.

(6) मला / आम्हांला याची जाणीव आहे की, मी / आम्ही “महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६” नुसार निर्धारित केलेल्या अग्निसुरक्षा उपाययोजना तसेच मुंबई अग्निशमन दलाकडून निश्चित केलेल्या सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजना (Codified Fire

Safety Measures) मधील निर्देशांचे पालन न केल्याचे आढळल्यास अथवा सदर परवानगी व्यतीरिक्त तात्पुरते किंवा पक्के बांधकाम केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी रद्द करण्यात येईल.

(7) मला / आम्हांस ही परवानगी दिल्यामुळे महानगरपालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका, त्यांचे अधिकारी, कर्मचारी व अभिकर्ता यांना त्यांच्या विरोधात करण्यात येणारी कोणतीही कारवाई, नुकसान भरपाई, मागणी, दावे इत्यादी पासून या हमीपत्राद्वारे बंधमुक्त करीत आहोत. उपरोक्त बाबी उद्भवल्यास त्यास सर्वस्वी मी / आम्ही जबाबदार असल्याचे याद्वारे मान्य करीत आहोत व त्याची सर्व जवाबदारी स्वेच्छेने घेत आहोत.

(8) मला/आम्हांला याची पूर्णपणे जाणीव आहे की, मी/आम्ही सादर केलेली माहिती खोटी आणि/किंवा चुकीची आढळल्यास मी/आम्ही दिवाणी तसेच फौजदारी कारवाईस पात्र असेन/ असू आणि परवानगी शुल्क ठेवीची रक्कम असल्यास ती जप्त केली जाईल.

(9) मी / आम्ही या द्वारे प्रतिपादन करतो व हमी देतो की हे हमीपत्र मला/आम्हांला/संस्थेचे अध्यक्ष, सचिव, व्यवस्थापकीय समिती व सदस्यांवर बंधनकारक राहिल व मी/आम्ही वेळोवेळी केलेल्या कृतीसाठी जबाबदार राहू.

मी / आम्ही ---------------------------------- असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की उपरोक्त माहिती ही माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी व अचूक असून मी/आम्ही स्वतः पडताळली आहे.

**मंडळाच्या अध्यक्षांचे नाव व सही**

**मंडळाच्या सचिवांचे नाव व सही**